# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
( शिक्षण विभाग )

क्र. १३०८/शि.वि. दि.27/11/2013.

**प्रति,**

**मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,**
**सर्व प्राथमिक / उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा, म.न.पा. नागपूर.**

**विषय :– गांधी विचार परीक्षेचे दि. 30/11/2013 रोजी आयोजन करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महात्मा गांधी याचा जिवन परीचय व विचारांची माहिती शालेय विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त म.न.पा. शाळांमध्ये दि. 30/11/2013 रोजी गांधी विचार परीक्षेचे **आयोजन** केले आहे. याबाबत सहयोग ट्रस्ट मार्फत हिंदी व मराठी भाषेतील संदर्भ पुस्तके आपल्या शाळांना वाटप करण्यात आले आहे. त्या पुस्तकांचे वाचन करून विद्यार्थ्यांना उपरोक्त परीक्षा दयावयाची आहे. यामध्ये इयत्ता 5 वी ते 12 वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करावयाचे आहे. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. ही परीक्षा सकाळपाळीत सकाळी 9.00 ते 10.00 व दुपारपाळीत 12.00 ते 01.00 या वेळी घ्यावयाची आहे. परीक्षेकरीता प्रश्नपत्रिकाचे वाटप दि. 29/11/2013 रोजी दुपारी 3.00 वाजता शिक्षण विभाग कार्यालयात करण्यात येईल. याकरीता श्री. टेंभूर्णे स.अ. यांच्याशी संपर्क साधावा. प्रश्नपत्रिका नेण्याकरीता शाळेचा स्टॅम्प घेवून मुख्याध्यापकाने यावे. तसेच परीक्षा ही कोणताही गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घेवून मुख्याध्यापकांनी आपल्या नियंत्रणात आयोजित करावी. काही शाळांमध्ये नियंत्रण पथक व पत्रकार भेट देणार आहेत तरी सर्वांनी दक्षतेने परीक्षेचे **आयोजन** करावे.

शिक्षणाधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर